संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवा काळ

॥ न मे भक्त प्रणश्यति ॥

# अभियांत्रिकी विद्यार्थ्यांच्या बेकारीचा प्रश्न

**पंतप्रधान** नरेंद्र मोदी एकीकडे मेक इन इंडिया स्टार्टअप इंडिया किंवा स्टँडअप इंडियाचा वारंवार नारा देत असताना देशातील साठ टक्के अभियांत्रिकी विद्यार्थी बेकार असल्याचा धक्कादायक अहवाल अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने सादर केला आहे. इतक्या प्रचंड प्रमाणावर जर अभियांत्रिकी विद्यार्थ्यांवर बेकार राहण्याची वेळ येत असेल तर भारतासारख्या सर्वाधिक युवा शक्ती असलेल्या देशाला ही गोष्ट अजिबात परवडणारी ठरत नाही. याच अहवालामध्ये हेही अतिशय स्पष्टपणे सांगितले आहे की, दर दिवशी वीस लाख मानवी दिवस हे वाया जात आहेत. म्हणजे दुसऱ्या शब्दात सांगायचे तर शिक्षण घेऊनही आणि आपली पात्रता सिध्द करूनही या तरुणांवर बेकार म्हणजेच जगाच्या भाषेत बोलायचे तर जॉबलेस राहण्याची वेळ आली आहे. गेल्या तीन वर्षांपासून नरेंद्र मोदी यांनी भारतात कोणत्याच संसाधनांची किंवा सामुग्रींची कमतरता दिली नाही. फक्त आहे त्या सगळ्या साधनांचा अधिक चांगल्या प्रकारे आणि वेगाने उपयोग करून घेता आला पाहिजे. परंतु अखिल भारतीय तंत्रशिक्षण समितीचा हा अहवाल अशा एका महत्त्वपूर्ण विषयावर बोट ठेवतो आहे की, देशातील उच्चशिक्षित आणि पूर्ण कार्यक्षमता असलेले युवक केवळ सरकारी धोरणांच्या नाकर्ते पणाचे बळी ठरत आहेत. आज देशभरामध्ये तीन हजार दोनशे अठ्ठ्याऐंशी सरकारी मान्यता असलेली अभियांत्रिकी महाविद्यालये आहेत. त्यामधून दरवर्षी किमान पंचवीस हजार अभियांत्रिकी विद्यार्थी शिक्षण घेऊन बाहेर पडतात. परंतु यापैकी केवळ तीन किंवा चार टक्के विद्यार्थ्यांना महाविद्यालयाच्या कँपसमधून नोकरी मिळू शकते. बाकीच्यांना महाविद्यालयीन शिक्षणानंतरही अन्य क्लासेसच्या माध्यमातून आपली पात्रता वाढवावी लागते. अनेक कॉर्पोरेट कंपन्यांमध्ये केवळ विद्यापीठाच्या गुणपत्रिकेवर किंवा पदवी प्रमाणपत्र दाखवून नोकऱ्या मिळत नाहीत. त्यांना इतर कोर्स करून पात्रता तर मिळवावी लागतेच, शिवाय मान्यताप्राप्त कंपन्यांमध्ये याच विद्यार्थ्यांकडून एक ते दोन वर्षांचा अनुभव मागितला जातो. हा सगळाच प्रकार विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेचीच खिल्ली उडवणारा किंवा सरकारनेच मान्यता दिलेल्या महाविद्यालयांच्या दर्जाविषयी गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण करणारा ठरतो. ज्या देशाला महासत्ता होण्याची स्वप्ने पडत आहेत, त्या देशातील साठ टक्क्यांची अभियांत्रिकी बुद्धिमत्ता जर उपयोगाविना वाया जात असेल तर तो प्रचंड विरोधाभास ठरतो. यासंदर्भात तातडीने सुधारणा होण्याची गरज आहे. उशिरा का होईना, परंतु मनुष्यबळ विकास मंत्रालयाच्या ही बाब लक्षात आलेली दिसते. आणि त्यांनी या बेकार किंवा जॉबलेस तरुणांच्या निर्मितीला रोखण्याचा काही प्रमाणात प्रयत्न सुरू केलेला पाहायला मिळतो.

## सर्वाधिक तरुणांच्या देशातील वास्तव

आज भारताच्या एकूण लोकसंख्येमध्ये ६५ टक्के युवकांची संख्या आहे. गेल्या पंचवीस वर्षांत विद्यार्थ्यांनी स्वतःची करियर निवडताना आणि एकूण जगाच्या बाजारात माहिती तंत्रज्ञान, पर्यावरण, वैद्यकीय ज्ञान, अवकाशविषयक नवीन अभ्यासक्रम या गोष्टींना महत्त्व प्राप्त झाले. हे लक्षात घेऊनच भारतातील विद्यार्थ्यांनीदेखील तशाच स्वरुपाच्या अभ्यासक्रमाची निवड केली. ही गरज लक्षात घेऊन अभ्यासक्रमही उपलब्ध करून दिले गेले. परंतु, ते देताना एकूण त्या क्षेत्रातील ज्ञानाशी किंवा व्यवहारिकतेशी सांगड घातली गेली नाही. आज मेकॅनिकल किंवा कॉम्प्युटरमधून इंजिनीअर झालेल्या विद्यार्थ्याला केवळ महाविद्यालयातील अभ्यासक्रमावर विसंबून राहाता येत नाही. त्या क्षेत्रात दरवर्षी नवीन घडामोडी होत असतात. परंतु, त्याची दखल महाविद्यालयांमधून घेतली जात नाही. सिलॅबसवर आधारित परीक्षा घेतल्या जातात आणि उत्पादन क्षेत्रामध्ये किंवा रोजगाराच्या बाजारामध्ये त्याचा उपयोग होत नाही. याचाच अर्थ सिलॅबसवर आधारित अभ्यासक्रम शिकवला जात असतानाच त्या क्षेत्रात घडणाऱ्या नव्या घडामोडींचे ज्ञान विद्यार्थ्याला महाविद्यालयातच दिले गेले पाहिजे आणि म्हणून आता मनुष्यबळ विकास मंत्रालयाने काही उपाययोजना सुचवल्या आहेत. त्यात ज्या अभियांत्रिकी महाविद्यालयांना आणि संस्थांना तंत्र परिषदेतर्फे मंजुरी दिली जाते. त्यांची गुणवत्ता अधिक कडक केली जाणार आहे. विद्यार्थ्यांना इंटर्नशिप किंवा उमेदवारी करण्याचा पर्याय उपलब्ध करून दिला जाणार आहे. याच संस्थांमधील शिक्षकांसाठीसुध्दा वार्षिक प्रशिक्षणाची सुविधा देण्याचा विचार सुरू झाला आहे. परीक्षेपुरता अभ्यास असा दृष्टिकोन न ठेवता त्या विषयातील कौशल्याला प्राधान्य देणारा अभ्यासक्रम किंवा तसे शिक्षण देण्याचा प्रस्ताव पुढे आलेला आहे.

## इंटर्नशिप सक्तीची हवी

संपूर्ण देशभरामध्ये जेवढ्या काही अभियांत्रिकी संस्था आहेत, त्यांतून फक्त चाळीस टक्के विद्यार्थ्यांना नोकऱ्या उपलब्ध होतात. ती परिस्थिती बदलून हे प्रमाण साठ टक्क्यांवर नेण्याचे उद्दिष्ट ठेवले गेले आहे. मनुष्यबळ विकास मंत्रालयाचा हा प्रयत्न योग्य आहेच, परंतु त्याच्या जोडीला अभियांत्रिकी महाविद्यालयात शिक्षण घेत असतानाच महिन्यातून किमान एक आठवडा किंवा वर्षातून एक महिना हा त्या त्या विद्यार्थ्याला इंटर्नशिपसाठी सक्तीचा केला पाहिजे. देशभरात असलेल्या विविध कॉर्पोरेट कंपन्यांमधून अशा प्रकारची इंटर्नशिप करण्याची सुविधा दिली गेली पाहिजे. कॉर्पोरेट कंपन्यांमधून कँपस सिलेक्शन केले जाते. चांगले गुण मिळवणाऱ्यांना ताबडतोब रोजगाराची संधी प्राप्त होते. परंतु, या स्पर्धेत सगळेच विद्यार्थी टिकाव धरू शकत नाहीत. अशा वेळी दरवर्षी सक्तीचे इंटर्नशिप उपलब्ध झाले तर तो विद्यार्थी त्याला आवडणाऱ्या विषयामध्ये कौशल्य प्राप्त करू शकतो. कदाचित या इंटर्नशिपमुळे तो त्याच्याच विषयातला व्यवसाय उभारू शकतो. बदलत्या काळानुसार परंपरागत अभ्यासाचा चाकोरीबध्द मार्ग परवडणारा नाही. या अभ्यासक्रमाला कालोचित प्रात्यक्षिकांची जोड दिली पाहिजे. म्हणजेच बदलणाऱ्या या विज्ञान तंत्रज्ञानाच्या युगात तो घेत असलेल्या ज्ञानाची उपयुक्तता तपासता येऊ शकेल. अनेक तरुण नोकऱ्यांसाठी परदेशी जाणे पसंत करतात. कारण थोड्या फार प्रमाणात का होईना, त्यांच्या या कार्यक्षमतेची आणि शिक्षणाची तिकडे कदर केली जाते. भारतात मात्र या तरुण अभियंत्यांना बेकारीच्या भीतीखाली वावरावे लागते.